निशाणी क्र.४४ खाली.

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.३ आकाश विजय गांधीले यांचा शपथेवर उलटतपास वादींतर्फे विधीज्ञ श्री. एम. डी. चव्हाण यांचेतर्फे सुरु...**

१४.　　माझे पदवीपर्यंत शिक्षण झाले आहे. मी वादीला ओळखत नाही. कोणत्या दस्त क्रमांकाद्वारे जमीन माझ्या नावावर आली तो दस्त क्रमांक मला सांगता येणार नाही. तो दस्त सन २०२१ मध्ये झालेला आहे. मला निश्चीत तारीख सांगता येणार नाही. मी उत्तमराव यांना पाहीलेले नाही. उत्तमरावच्या जमीनी कोठे कोठे आहेत हे मला माहित नाही आणि किती किती आहेत हे देखील माहित नाही. आजी सांगत होती की आजीला सोडल्यानंतर उत्तमरावने दुसरे लग्न केले. दुसरी पत्नी कुठली होती हे मला माहित नाही. माझी आजी लिलाबाईला नोकरी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, उत्तमरावने स्वकष्टाने जमीन आणि घर घेतले आहे. लिलाबाई दुधाचा व्यवसाय करत होती. दुध किती निघत होते हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, लिलाबाईचा व्यवहार कसा आहे काय आहे हे मला माहित नाही.

१५.　　उत्तमराव कधी वारले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील घर वादीच्या ताब्यात आहे आणि वादीने त्या घराला कुलुप लावले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माळखेड आणि अंत्री देशमुख शिवारातील जमीनीची देखभाल वादी करतात. हे मला माहित नाही की, उत्तमराव आणि लिलाबाई हे किती वर्ष एकत्र राहीले. हे म्हणणे खरे नाही की, उत्तमराव, लिलाबाई आणि त्यांची दुसरी पत्नी शोभाबाई ह्या मेहकर येथील घरात एकत्र राहत होते.

प्रश्न– शोभाबाई आणि लिलाबाई यांचे पटत नसल्यामुळे उत्तमराव हे काही दिवस शोभाबाईकडे जालना येथे आणि काही दिवस लिलाबाई कडे मेहकर येथे राहत होते ?
उत्तर– मी आजी लिलाबाईकडे राहत असतांना उत्तमराव आले नाही आणि कोणीही आले नाही.

१६.　　जवळपास २० वर्षपर्यंत मी आजी लिलाबाईकडे कोणी येतांना पाहीले नाही. हे मला माहित नाही की, लिलाबाईला अपत्य नसल्यामुळे उत्तमरावने

शोभाबाईसोबत दुसरे लग्न केले. अंत्री देशमुख येथील शेतीचा गट क्र.७१ आहे. माळखेड शिवारातील जमीनीचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. अंत्री देशमुख मध्ये सव्वा दोन एकर आणि माळखेड येथील शेतीचे पावणेदोन एकर क्षेत्रफळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, लिलाबाईकडे कुठलाही दुध व्यवसाय नव्हता. मेहकर येथील घराला नंबर नाही. ते घर वार्ड क्र.१५ मध्ये येते. मेहकर येथील घराचा नंबर मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या घराचा टॅक्स वादी भरतात. हे म्हणणे खरे नाही की, २०२१ मध्ये जी मालमत्ता घेतली ती दावा दाखल झाल्यानंतर घेतली. हे म्हणणे खरे नाही की, अंत्री देशमुख मधील जमीनीमध्ये वादीने कपाशीची लागवड केली आहे.

१७. हे मला माहित नाही की, लिलाबाईला मारुन टाकल्याबद्दल वादीने मेहकर पोलीस स्टेशन मध्ये रिपोर्ट दिला होता. हे मला माहित नाही की, वादी हे उत्तमरावचे मुल आहेत. हे म्हणणे खरे नाही की, संपुर्ण वाद मिळकत ही उत्तमरावने विकत घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हे उत्तमरावचे वारस असल्याने वाद मिळकत ही आजरोजी त्यांच्या ताब्यात आहे.

प्रश्न– जे घर मी खरेदी केले ते वादीच्या सही किंवा संमतीविना खरेदी केले ?
उत्तर– वादीची सही किंवा संमती घेण्याचा प्रश्नच येत नाही.

१८. हे म्हणणे खरे नाही की, मी, किरण वानखडे आणि शकुंतला यांनी शेतामध्ये अडथळा निर्माण केला. हे म्हणणे खरे नाही की, वादी हे जालना येथे राहत असल्याने मी वादीला त्रास देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आणि आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by TRIVENI SURESHRAO GAIGOLE
Date: 2026.01.21 17:50:27 +0530

DISTRICT COURT, MAHARASHTRA

दिनांक : २१/०१/२०२६

**( टि. एस. गायगोले )**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मेहकर.